वार्षिक सर्वसाधारण सभा

वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित. सी. बी. डी. बेलापूर महाराष्ट्र सोसायटीची 'वार्षिक सर्वसाधारण सभा' (सदर) रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सोसायटीच्या आवारात सोसायटीचे चेअरमन मा. श्री. दिपक गौतम बोले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित. सी.बी.डी बेलापूर सोसायटीचे सचिव श्री. विनायक सुरेश चौगुले यांनी सभेस उपस्थित असणाऱ्या सर्व सभासदांचे स्वागत केले व तसेच भरपावसामध्ये सभेस उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभारही मानले व सभेस सुरुवात करण्यासाठी मा. अध्यक्षांच्या परवानगीने वार्षिक सर्वसाधारण सभेस सुरुवात केली.

विषय क्रं. १ ठराव

वार्षिक सर्वसाधारण सभेचे विषय खालीलप्रमाणे मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित. सी.बी.डी.चे सचिव श्री. विनायक सुरेश चौगुले यांनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व विषय उपस्थित सभासदांसमोर वाचून दाखविले. उपस्थित सर्व सभासदांनी मागील वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयास एकमताने मंजूरी दिली.

सूचक :- गोविंद रावरिया
अनुमोदक :- सौ. रिया भोईर

विषय क्रं. २ ठराव.

सिडको दफरी नोंद असणाऱ्या सर्व रुम मालकांना सोसायटीमध्ये सभासद करुन घेण्याबाबत.

वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मध्ये एकुण ३०० पैकी २६१ संस्थेचे सभासद झाले आहेत. उर्वरित ३९ सभासदांना C-10 अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन मध्ये ज्यांचे नावावर सिडको दफरी नोंद आहे त्यांना सभासद करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले.

पॉवर ऑफ ॲटर्नी ने ज्यांनी रुम घेतली आहे त्यांना Conditional Allotment Agreement करुन त्यांचे नाव तात्पुरते घेण्याचे आहे व सदर रुमचे सर्व कागदपत्रे तयार करुन त्यांनी स्वतःच्या स्वखर्चाने त्यांच्या नावावर करुन घेण्याचे आहे या अटीवरती त्यांना सभासद करुन घेण्याचे ठरले. ने ३९ सभासद बाकी आहेत त्यांनी

त्यांच्या घरची कागदपत्रे वकरवीने तयार करुन सिडको दप्तरी नोंद घालून सिडकोची प्रत सोसायटी कार्यालयात लवकरात लवकर जमा करावित असा ठराव उपस्थित सर्व सभासदांनी एकमताने मंजूर केला.

सूचक :- अरविंद मोरे
अनुमोदक :- मुकेश मिश्रा

विषय क्रं. ३ ठराव

सोसायटीचा वार्षिक ताळेबंद व लेखापरिक्षण अहवाल (Audit Report) यावर चर्चा व मंजुरी

वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितचे सचिव श्री. विनायक चौगुले व खजिनदार श्री. अजय चौगुले यांनी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा सोसायटीचा वार्षिक ताळेबंद व लेखापरिक्षण अहवाल विस्तृतपणे व विश्लेषणासहित सभेस उपस्थित असणाऱ्या सर्व सभासदांसमोर मांडला. त्यावेळी सभेस उपस्थित असणाऱ्या सभासदांनी सन २०२४-२५ च्या वार्षिक ताळेबंद व लेखापरिक्षण अहवालास एकमताने मंजूरी दिली.

सूचक :- श्री. हिंदुराव कांबळे
अनुमोदक :- श्रीमत शितल गवादळे

विषय क्रं. ४ ठराव

सोसायटीच्या एस. एस. सी. (S.S.C.) बोर्ड थकबाकी रकमेचे Waive off (माफ) करण्याबाबत.

वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितचे खजिनदार श्री. अजय चौगुले यांनी उपस्थित सर्व सभासदांना सांगितले की, एस. एस. सी. बोर्ड (S.S.C) ही एक सरकारी संस्था आहे व सदर संस्थेच्या व आपल्या सोसायटीमध्ये एकूण ६ क्रम आहेत सदर क्रमचा मेन्टनन्स चार्जेस केव्हापासून आपल्याला देण्यात आला परंतु सदर मिळणारी रक्कम ही त्यांच्यानावे जमा न होतलेने त्यांचे एकूण मेन्टनन्स व त्यावरती आकारले गेलेले व्याज त्यामुळे एस. एस. सी. बोर्डाकडून येणारी थकबाकी जास्त दिसत असल्याचे सांगितले. त्याबाबत झालेला ठराव खालीलप्रमाणे.

ठराव करण्यात येतो कि, "आपल्या गृहनिर्माण सोसायटीमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मुंबई विभागीय मंडळ यांच्या मालकीच्या

६ सदनिका आहेत या सदनिकांपोटी आकारण्यात आलेल्या व मागणी केलेल्या सेवा खर्चापोटी (Service Charges) रक्कम रु. ९४,९५०/- तत्कालिन असोसिएशनच्या बँक खाती दिनांक २२/०२/२०२१ रोजी जमा झाली आहे. सदर रक्कम जमा झालेल्या वेळी नेमकी कोणत्या सदनिकेकरिता किती रक्कम जमा केली आहे याचा तपशील उपलब्ध न झाल्याने सदस्यी जमा केलेली रक्कम "महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागिय मंडळ यांच्या सेवा खर्च (Service Charges) येणे बाकी जमा दर्शविली गेली आहे. त्यामुळे संबंधित २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकामध्ये मंडळाच्या सेवा खर्चाच्या (Service Charges) येणे बाजुला जमा न झालेली रक्कम रु. ९४,९५०/- या आर्थिक वर्षात कमी (Reduce) करणे गरजेचे आहे. ही रक्कम तत्कालिन असोसिएशनच्या खाती जमा झाल्याने संबंधित आर्थिक वर्षात ताळेबंद, नफा-तोटा पत्रकामध्ये केवळ जमा नोंद आहे. परंतु सदस्यी नोंद बँक खाते नावे करून सेवा खर्च (Service Charges) खाती जमा करणे आवश्यक होते. परंतु तसे करणे राहिले आहे. त्यामुळे या नोंदिची कमी आर्थिक वर्षात शक्य नसल्याने मंडळाकडून जमा झालेली परंतु त्यांच्या सेवा खर्चात (Service Charges) जमा न झालेली रक्कम रु. ९४,९५०/- व त्यावरिल व्याज संबंधित मंडळाच्या येणे सेवा खर्चामधून (Service Charges) निर्लेखित (Write Off) करण्यात यावी.

या निर्लेखनामुळे (Write Off) सोसायटीचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही याची माहिती सभेत देण्यात आली. त्यानुसार सदर रक्कम निर्लेखन (Write Off) करण्यात येण्याचा ठराव उपस्थित सर्व सभासदांनी हात उंचावून ठराव मंजूर केला.

सूचक :-

अनुमोदक :-

विषय क्र. ५ — मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय

१) सोसायटी फॉरमेशन रु. ५०००/- व सोसायटी लिज डिड ५२००/- बाकी

मा. अध्यक्ष श्री. दिपक गौतम बोले यांनी सांगितले कि, ज्या सभासदांचे आज अखेर रु. ५००० व रु. ५२०० हे देणे बाकी आहेत अशा सभासदांच्या मासिक मेन्टनन्समध्ये वर्ग करण्याचा ठराव उपस्थितासमोर मांडला असता उपस्थित सर्व सभासदांनी रु. ५००० व रु. ५२००/- अशित असणाऱ्या सभासदाच्या मेन्टनन्स खात्यात वर्ग करण्यास बहुमताने मंजूरी दिली

त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. दिपक गौतम बोले यांनी उपस्थित सर्व सभासदांचे मनपूर्वक आभार मानले व त्यांना आश्वासित केले कि ~~पुन्हा~~ इमारत पुनर्विकासाचे काम अत्यंत योग्य व सुरक्षितपणे पार पडेल तसेच सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ देणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर उपस्थित सर्व सभासदांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेण्याची विनंती करुन सभा संपुष्टात आल्याचे जाहिर केले.

VASUNDHARA CO.OP. HSG. SOC. LTD.

Chairman Secretary Treasurer